**PRESS MONITOR**

Publication : Vartadeeps
Edition : Mumbai
Date : July 13 - 19, 2017

# 'मूनबो'ची किफायतशीर अल्फियस वॉटर प्युरिफायर बाजारात दाखल

नवी दिल्ली : नेत्रदीपक अशाहार्डवेअर ब्रॅण्डचे मालक असलेल्या एचएसआयएल लिमिटेड या कंपनीची नवी नाममुद्रा 'मूनबो'च्या वॉटर प्युरिफायर उत्पादनांच्या पोर्टफोलिओमध्ये वाढ करण्यात आली असून अल्फियस हा नवा कोरा वॉटर प्युरिफायर कंपनीतर्फे अत्यंत किफायतशीर दरात आणि कलात्मक रचनेसह बाजारपेठेत दाखल करण्यात आला आहे. पाच पातळ्यांवरील जल शुद्धीकरण प्रक्रिया आणि खनिज बंदी



म्हणजेच मिनरल फोर्टीफिकेशन या दोन अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा प्रक्रिया हे या उत्पादनाचे वैशिष्ट्य असून हा प्युरिफायर केवळ ९ हजार ९९० रुपयांना उपलब्ध आहे. एचएसआयएल लिमिटेडचे कन्झ्युमर बिझनेस विभागाचे अध्यक्ष राकेश कौल म्हणाले, 'स्वच्छ पेय जलाच्या बाबतीत भारतीयांना मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. अल्फियसच्या सादरीकरणातून, आम्ही आमच्या ग्राहकांना अत्याधुनिक आरओ, १८०० पीपीएमपर्यंतचे टीडीएस रिमुव्हल, एलईडी इण्डीकेटर्स आणि पूर्ण जलशुद्धीकरणाच्या आधुनिक सुविधा आकर्षक किंमतीत व अत्युत्कृष्ट डिझाईनसह देत आहोत.'